# यावल महाविद्यालयात वसुंधरा दिन उत्साहात साजरा

जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भूगोल विभागातर्फे जागतिक वसुंधरा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.आर.डी. पवार होते तर अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी भूषविले.

प्रारंभी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी परिसराची स्वच्छता केली.त्यानंतर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.डॉ. आर.डी.पवार यांनी विचार व्यक्त केले की वृक्ष तोड मोठ्या प्रमाणात  झाल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढलेले आहे. त्यासाठी आपण मोठ्या प्रमाणामध्ये वृक्ष लागवड केली पाहिजे. अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ.संध्या सोनवणे यांनी प्रतिपादन केले की पृथ्वीवरील जैवविविधतेचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाल्यामुळे विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. पृथ्वीच्या संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकांनी आपला सहभाग देणे गरजेचे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री नरेंद्र पाटील यांनी केले तर आभार सुभाष कामडी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपप्राचार्य प्रा.ए.पी. पाटील सर, प्रा.एम.डी. खैरनार,प्रा डॉ. सुधा खराटे, एम. पी.मोरे यांनी सहकार्य केले.कार्यक्रमास अनेक विद्यार्थी उपस्थित होते.


कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
यावल
वसुंधरा दिन
64MP AI QUAD CAMERA
Shot by Narendra